# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(दुपार)

**दिनांक २१.०८.२०२६ शुक्रवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २०.०८.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ०७ केसेसमध्ये १२ ईसमावर कारवाई करून एकुण ५,५४,८६१/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०३ केसेसमध्ये ०७ इसमांवर कारवाई करुन ४,६२५/—रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,१५९ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,२२,९५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पोलीसांची कामगीरी :— घरफोडीचा गुन्हा उघडकीस. आरोपीस अटक.**

दिनांक १५.०८.२०२६ चे ०८.१५ वा. ते १६.०८.२०२६ चे १०.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे नवीन कामठी हद्दीत, न्यु कॉलनी, सईद नगर, कामठी येथे राहणारे फिर्यादी वसीम अख्तर कलीम अख्तर वय ३४ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह त्यांचे सासुरवाडीला गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे वरचे माळयावरील बेडरुमचे मागचे दार उउघून, आत प्रवेश करुन, घरातील रोख ८,०००/—रू. तसेच, सोन्याची अंगठी, चांदीची पैंजण, ०१ मोबाईल, ०१ जेन्टस पर्स ज्यात कॅस्ट्रल कंपनीचे कुपन, २ एटीम कार्ड, पॅनकार्ड, वाहन चालक परवाना असलेले, असा एकुण किंमती अंदाजे १६,५००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नवीन कामठी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान गुन्हेशाखा युनिट क्र. ५ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपी विशाल उर्फ नॉडी राजाराम कुशवाह वय १९ वर्षे रा. नया गोडावून, वाल्मिकी मंदीरजवळ, नवीन कामठी, नागपुर यास ताब्यात घेऊन, गुन्हयासंबंधाने विचारपुस केली असता, त्याने वर नमुद घरफोडीचा गुन्हा त्याचे साथीदार पाहिजे आरोपी क्र. १) सोहेल दर्गा रा. वारीसपुरा कामठी, २) युसुफ रा. वारीसपुरा, लाल मदरसा चौकाजवळ, कामठी यांचेसह संगनमताने केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन गुन्हयातील चोरी गेलेला संपुर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपीस मुद्येमालासह नवीन कामठी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. विनायक गोल्हे, पोउपनि. विशाल सांगोळे, पोहवा राजु टाकळकर, शेख नजीर, प्रविण भगत, राजा टाकळीकर, रुपेश नानवटकर, प्रमोद बावणे, अनिस खान, अमोल भक्ते, पोअं, दीपक बावणकर, विशाल नागभिडे, सुधिर तिवारी व लिलाधर खिरटकर यांनी केली.



**<u>३) गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथक पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरीचे ०२ गुन्हे उघडकीस.</u>**

दिनांक ०८.०८.२०२६ चे १८.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे वाडी हद्दीत महादेव नगर, प्लॉट क्र. ६७, हॅन्डपंपजवळ, वाडी, नागपूर येथे राहणारे फिर्यादी चंद्रभुषण ननु पांडे वय ५६ वर्षे यांनी त्यांची होन्डा शाईन क्र. एम.एच. ४० बीएस ४८५२ किंमती ४०,०००/—रू. ची ही आपले राहते घरासमोर लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद गाडी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाडी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे समांतर तपासात, गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून एका विधीसंघर्षग्रस्त वालकास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा त्याचा साथीदार पाहिजे आरोपी नामे शैलेष रामदास कुमरे वय २७ वर्ष रा. हरीओम सोसायटी, वाडी आणि एक विधीसंघर्षग्रस्त वालक यांचेसह संनगमताने केल्याची कबुली दिली. ताब्यातील विधीसंघर्षग्रस्त वालकास अधिक विचारपुस केली असता, त्याने वर नमुद गुन्हयाव्यतिरिक्त पोलीस ठाणे वाडी हद्यीत इतर ठिकाणी एक वाहन चोरी असे एकूण ०२ वाहनचोरीचे गुन्हे केल्याचे सांगितले. त्याचे ताब्यातुन चोरी केलेले होंडा शाईन दुचाकी क्र. एमएच ४० बीएस ४८५२ आणि होंडा शाईन दुचाकी क्र. एमएच ४० बीझेड २४८८ असे ०२ वाहने किंमती अंदाजे १,००,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. विधीसंघर्षग्रस्त वालकास मुद्देमालासह पुढील कारवाईकामी वाडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहिजे आरोपी व विधीसंघर्षग्रस्त वालकाचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. रविंद्र नाईकवाडे, पोहवा विलास कोकाटे, रोशन तिवारी, किशोर सोमकुंवर, अजय शुक्ला, नितीन वर्मा, सचिन बढीये, राहुल कुसरामे यांनी केली.



**४) गुन्हेशाखा युनिट क्र. ४ पोलीसांची कामगिरी :—एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २०.०८.२०२६ चे २१.३० ते २२.५५ वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ४ चे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, केडीके कॉलेज टी पॉईन्ट जवळील मैदानात एक इसम संशयास्पद उभा असून, तो पुडीतुन अंमली पदार्थ विक्री करीत आहे. अशा माहितीवरुन, घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम टिव्हीएस ज्युपिटर मोपेडजवळ कोणाची तरी वाट पाहतांना संशयास्पद दिसून आला. त्यास घेराव टाकून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने आपले नाव नुर मोहम्मद उर्फ मोबीन फिरोज खान वय २३ वर्ष रा. शिवणकर झोपडपट्टी, गली क्र. ३, ताजुल मस्जिदजवळ, नंदनवन, नागपूर असे सांगितले. त्याचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरुन, एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन, त्याची व त्याचे ताब्यातील मोपेडची झडती घेतली असता, त्याचे मोपेडमध्ये एक झिपलॉक पन्नीमध्ये अंमली पदार्थ एमडी पावडर वजनी १०.८६० ग्राम तसेच, अंमली पदार्थ विक्रीचे रोख ३,५२०/—रु. मिळून आले. आरोपीस अधिक विचारपुस केली असता, त्याने त्याची साथीदार महिला आरोपी नामे रुक्सार हिचेकडून विक्रीकरीता आणल्याचे सांगितले. आरोपीचे ताब्यातुन अंमली पदार्थ विक्रीचे रोख ३,५२०/— रु., एमडी पावडर, ०१ मोबाईल फोन व मोपेड गाडी असा एकुण १,७८,५२०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे एनडीपीएस कायद्यानुसार होत असल्याने, पोलीस ठाणे नंदनवन येथे आरोपीविरूध्द कलम ८(क),२२(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव नंदनवन पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहिजे महिला आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. बाबुराव राऊत, पोउपनि जितेशाचारी आरवेल्ली, पोहवा अजय यादव, पुरुषोत्तम जगनाडे, निलेश ढोणे, पोअं. गोविंद देशमुख, गंगेश्वर सुवासार, मपोअं. रुखसार यांनी केली.



**५) पाचपावली पोलीसांची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

**अ)** दिनांक २०.०८.२०२६ चे १९.०० वा. ते २०.५० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे पाचपावली येथील तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, वैशालीनगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गार्डन जवळील रोडवर, सार्वजनिक ठिकाणी सापळा रचुन एका काळया रंगाच्या स्प्लेंडर गाडी क्र. एमएच ४९ बीव्ही ८५२२ वरील इसमास थांबवुन ताब्यात घेतले. वाहनचालकास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नावे अलकाफ मोहम्मद मुकीम मलिक वय २४ वर्षे, रा. हमीदनगर, यशोधरानगर चौक, नुरी मस्जिदमागे, नागपूर असे सांगीतले. त्याचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून, एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन, पंचासमक्ष त्याची व वाहनाची झडती घेतली असता, त्याचे ताब्यातुन झिपलॉक पन्नीत एकुण ५.९० ग्रॅम एमडी पावडर मिळुन आली. आरोपीस अधिक विचारपुस केली असता, त्याने त्याचा साथीदार पाहिजे आरोपी कैफ मलिक वय २२ वर्ष रा. नई वस्ती टेका, अबु बकर मस्जिदजवळ, पाचपावली, नागपूर याचे मदतीने एमडी पावडर विक्रीकरीता आणल्याचे सांगितले. आरोपीचे ताब्यातुन एम.डी. पावडर, ०१ मोबाईल व दुचाकी वाहन असा एकुण १,७४,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे एनडीपीएस कायद्यानुसार होत असल्याने, फिर्यादी पोहवा राजेश कोकाटे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे पाचपावली येथे आरोपीविरूध्द कलम ८(क),२२(ब),२९ एन.डी.पी.एस. अॅक्ट अन्वये गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**ब)** दिनांक २०.०८.२०२६ चे २१.४५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे पाचपावली येथील तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, बास्केटबॉल ते अहमदनगर ग्राऊंड चे गल्लीमध्ये, वैशालीनगर येथे भुषण खापरे नावाचा इसम एमडी पावडर विक्रीकरीता उभा आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन नमुद ठिकाणी जाऊन, पाहणी केली असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा इसम संशयीतरित्या दिसून आला. त्यास घेराव टाकून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नावे भुषण सचिन खापरे वय १९ वर्षे रा. स्वामी नगर, आरके कम्प्युटर्स जवळ, पाचपावली, नागपूर असे सांगीतले. त्याचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून, एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यातुन झिपलॉक पन्नीत एकुण १६.४ ग्रॅम एमडी पावडर मिळुन आली. आरोपीस अधिक विचारपुस केली असता, त्याने त्याचा साथीदार पाहिजे आरोपी आकाश उर्फ मानुस चंद्रभान पराते रा. बाळाभाऊपेठ, पाचपावली याचे मदतीने एमडी पावडर विक्रीकरीता आणल्याचे सांगितले. आरोपीचे ताब्यातुन एमडी पावडर, ०१ आयफोन मोबाईल व रोख ४००/— रु. असा एकुण २,०४,४००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे एनडीपीएस कायद्यानुसार होत असल्याने, फिर्यादी पोहवा प्रकाश पखान यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे पाचपावली येथे आरोपीविरूध्द कलम ८(क),२२(ब),२९ एन.डी.पी.एस. अॅक्ट अन्वये गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. राहुल मदने, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ३), मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. अनिरुध्द पुरी, मपोउपनि. नुतन जाधव, पोहवा राजेश कोकाटे, प्रकाश पखान यांचे तपास पथकांनी केली.

**६) गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक २१.०८.२०२६ चे ०२.३० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. ५ चे अधिकारी व अंमलदार हे हद्दपार आरोपी चेक करीत असता, पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत, शारदा नगर, प्लॉट क्र. ३८, गोपालकृष्ण लॉन मागे राहणारा हद्दपार ईसम नामे विजय शामराव चन्ने वय ४९ वर्षे यास त्याचे राहते घरी चेक केले असता, तो मिळुन आल्याने, पंचासमक्ष त्यास ताब्यात घेतले. आरोपीचा अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परीमंडळ क्र. ०५ यांचे हद्दपार आदेश क्र. ४८/२०२५ दिनांक ३१.१२.२०२५ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०१ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे वाठोडा येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. आरोपीस पुढील कार्यवाहीस्तव वाठोडा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. विनायक गोल्हे, पोहवा. राजेंद्र टाकळीकर, प्रविण भगत, अमोल भक्ते, पोअं. दिपक बावणकर, सुधिर तिवारी यांनी केली.



**७) गुन्हेशाखा युनिट क्र. १ पोलीसांची कामगिरी :— शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २०.०८.२०२६ चे २२.४५ वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. १ पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे राणा प्रतापनगर हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना हॉटेल रेडीसन ब्ल्यु कडून नरेंद्रनगर पुलाकडे जाणाऱ्या सिमेंट रस्त्यावर एक कत्था रंगाची ज्युपिटर गाडीने एक इसम संशयीतरित्या जातांना दिसून आला. त्यास हटकले असता, तो वाहनासह पळु लागल्याने त्याचा पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव सौरभ दादाराव चपाने वय २७ वर्षे, रा. धम्मदीपनगर, यादव किराणा दुकानाजवळ, आयबीएम रोड, गिट्टीखदान, नागपुर असे सांगीतले. त्याचे ताब्यातील वाहनाची झडती घेतली असता, मोपेडचे डिक्कीमध्ये एक लोखंडी चाकु किंमती अंदाजे ५००/— रू. चा मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन लोखंडी चाकु व टिव्हीएस ज्युपिटर मोपेड क्र. एमएच ३१ जीएफ ९४५१ असा एकूण ८०,५००/— रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने शस्त्र बाळगुन मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे राणा प्रतापनगर येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का.,

सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईकामी राणा प्रतापनगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. प्रशांत ठवरे, पोउपनि ओमप्रकाश कोठे, पोहवा. नितीन वासनिक, मनोज टेकाम, रितेश तुमडाम व अजमत शेख यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे बेलतरोडी :— जिवे ठार मारणाऱ्या ०२ आरोपींना अटक.</u>**

फिर्यादीचा मुलगा नामे गौरव पंकज रगडे वय २७ वर्ष रा. प्लॉट क्र. १५३, कुंजीलाल पेठ, शाळेच्या मागे, अजनी, नागपूर याचा प्रेमविवाह दिपाली विजय साळुंके वय २४ वर्ष हिचेसोबत झाला होता. लग्नानंतर दिपालीचे ऋषिकेश खोडे नावाचे मुलासोबत प्रेमप्रकरण सुरु असल्याचे फिर्यादीचे मुलास माहित झाल्याने, त्यांचे मागील दहा ते पंधरा दिवसापुर्वी आपसात भांडण झाल्याने, दिपाली गौरवला सोडून वेगळी राहत होती. दिनांक २०.०८.२०२६ चे १७.०० ते १७.४० वा. चे दरम्यान, फिर्यादीचा मुलगा गौरव हा दिपाली व ऋषिकेश यांचे प्रेमप्रकरणाबाबत समझोता करण्याकरीता पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत, नरेंद्रनगर नाल्याचे पुलाजवळ गेला असता, तेथे ऋषिकेश खोडे व त्याचा मित्र गौरव राऊत व अभिषेक वासनिक हजर होते. त्यांचे आपसात भांडण झाल्याने आरोपी १) ऋषिकेश खोडे, २) गौरव रामभाऊ राऊत वय २७ वर्ष रा. विघ्नहर्ता कॉलनी, राडेगाव, चौफुलीजवळील शिवमंदीरजवळ, कळंब जि. यवतमाळ ३) अभिषेक राजकुमार वासनिक वय २९ वर्ष रा. सिदधेश्वरी नगर, भेंडे आटा चक्कीजवळ, प्लॉट क्र. १४, हुडकेश्वर, नागपूर यांनी आरोपी क्र. ४) दिपाली उर्फ बाली गौरव रगडे वय २५ वर्ष हिचे सांगण्यावरुन संगनमत करुन, फिर्यादीचे मुलास चाकुने वार करुन जिवे ठार केले.

याप्रकरणी फिर्यादी पंकज रुपचंद रगडे वय ५१ वर्ष रा. प्लॉट क्र. १५३, कुंजीलाल पेठ, शाळेच्या मागे, अजनी, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे बेलतरोडी येथे आरोपींविरुध्द कलम १०३(१),३(५) भान्यासं. सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. घटनेचे गांभिर्य ओळखून बेलतरोडी व अजनी पोलीसांनी तात्काळ दखल घेऊन, अजनी पोलीसाचें तपास पथकाने आरोपी क्र. २ व ३ यांना ताब्यात घेतले व पुढील कार्यवाहीस्तव बेलतरोडी पोलीसांचे ताब्यात दिले. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपी क्र. १ व ४ यांचा शोध व पुढील तपास सुरु आहे.

**२) पोलीस ठाणे हुडकेश्वर :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २०.०८.२०२६ चे २१.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत प्लॉट क्र. ५२, बद्रीनाथ सोसायटी, गुलाबराव येरपुडे यांचे घरी किरायाने, महाकाली नगर, गली क्र. ३, मानेवाडा येथे राहणारे फिर्यादी प्रशांत मेघश्याम गुरनुले वय ३९ वर्ष यांची मुलगी नामे कु. क्रिशा वय ५ वर्ष ही रात्रीचे जेवणानंतर शेजारील काकासोबत घराबाहेर रस्त्यावर फिरत असता, घरासमोरील सिमेंट रोडवर एका काळया रंगाची औरा हुंदई कार क्र. एमपी २८ झेंडसी ७०६० चा चालक आरोपी गौरव मालविय रा. मानेवाडा, नागपूर याने त्याचे ताब्यातील कार भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन, फिर्यादीचे मुलीस जोरदार धडक देऊन गंभीर जखमी केले. गंभीर जखमी हिला उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तिला तपासुन मृत घोषित केले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे पोउपनि. योगेश कोरडे यांनी आरोपी कार चालकाविरूध्द कलम १०६(१),२८१ भा.न्या.सं. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**